atcom technologies ltd

February 02, 2021

To,
**The Listing Department**
**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, 5th Floor,
Bandra-Kurla Complex,
Bandra East, Mumbai– 400 051
Scrip Code: ATCOM

To,
**The Listing Department**
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai – 400 001
Scrip Code- 527007

**Sub: Intimation of the Board Meeting of Atcom Technologies Limited as per Regulations 29 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 to consider and approve the Un-Audited Financial Results for the quarter ended on 31.12.2020**

Dear Madam/Sir,

Notice is hereby given that pursuant to Regulation 29of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations"), that the Meeting of the Board of Directors of Atcom Technologies Limited ("the Company") is scheduled to be held on Friday, February 12, 2021, to consider and approve the Un-Audited Financial Results of the Company for the quarter ended December 31, 2020 along with the limited review report thereon.

Further, in accordance with the Code of Conduct for Prevention of Insider Trading framed by the Company pursuant to the SEBI (Prohibition of Insider Trading) Regulations, 2015, the trading window for dealing in securities of the Company shall remain closed until 48 hours after the financial results approved at the meeting are made public.

Kindly take note of the above.

Thanking You.

Yours faithfully,

**For Atcom Technologies Limited**

**Vikram Doshi**
Managing Director
DIN: 00063455

atcom technologies ltd

February 03, 2021

To,
**The Listing Department**
**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, 5th Floor,
Bandra-Kurla Complex,
Bandra East, Mumbai– 400 051
Scrip Code: ATCOM

To,
**The Listing Department**
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai – 400 001
Scrip Code- 527007

**Sub: Newspaper Advertisement – Disclosure under Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("SEBI Listing Regulations")**

Dear Madam/Sir,

Pursuant to Regulation 47 of SEBI Listing Regulations, please find enclosed herewith copies of the Notices of the Board Meeting published in newspapers, viz., Business Standard (in English newspaper) and Mumbai Tarun Bharat (in Marathi newspaper) today, i.e., on Wednesday , February 03, 2021.

The above information is also available on the website of the Companywww.atcomtech.co.in.

This is for your information and record.

Kindly take note of the above.

Thanking You.

Yours faithfully,

**For Atcom Technologies Limited**

ATCOM TECHNOLOGIES LTD. MUMBAI-31

**Vikram Doshi**
Managing Director
DIN: 00063455

Encl.: As above

1. Newspaper cutting of Business Standard (in English newspaper)
2. Newspaper cutting of Mumbai Tarun Bharat (in Marathi newspaper)

**ATCOM TECHNOLOGIES LIMITED**
CIN: L29299MH1989PLC054224
Regd. Office: Flat No. 5, Sannidham, Plot No. 145, Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai 400031
Tel No: 022 35566211 | Email: contact@atcomtech.co.in | Website: www.atcomtech.co.in

# यंदा मनपाच्या शालेय क्रीडा महोत्सवावर फुली

## 'कोरोना'मुळे यंदा शिक्षण विभागाची सावधगिरी

**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी):** कोरोनामुळे 'पुष्पोत्सवा'पाठोपाठ आंतरशालेय क्रीडा महोत्सवावरही फुली मारण्याची वेळ महापालिकेवर आली आहे. कोरोनाची रुग्णसंख्या कमी झाली असली, तरी या आजारापासून पूर्णतः सुटका झालेली नसल्याने महापालिकेच्या शिक्षण विभागाने यंदा आंतरशालेय क्रीडा स्पर्धेला फाटा दिला आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून दरवर्षी आंतरशालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. २०१४ मध्ये क्रीडा स्पर्धा आयोजित केल्यानंतर तब्बल पाच वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर गतवर्षी या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. शाळा, केंद्र, विभाग आणि शहर अशा चार टप्प्यांत या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. महापौर सतीश कुलकर्णी यांनी या क्रीडा महोत्सवाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला होता. कबड्डी, खो-खो, लंगडी या मैदानी क्रीडा प्रकारांच्या लहान व मोठ्या गटांमध्ये स्पर्धा झाल्या होत्या, तर समूहगान, समूहनृत्य आणि लेझीम अशा तीन प्रकारांमध्ये सांस्कृतिक स्पर्धाही घेण्यात आल्या होत्या. शालेय पातळीवर दि. १३ ते १५ जानेवारी, केंद्र पातळीवरील स्पर्धा दि. १६ ते १८ जानेवारी आणि दि. २० ते २२ जानेवारी या कालावधीत विभाग पातळीवर, तर शहर पातळीवरील अंतिम स्पर्धा दि. २८ ते ३० जानेवारी या दरम्यान पार पडल्या होत्या. अंतिम स्पर्धेतील विजेत्या संघांना



'महापौर चषका'ने सन्मानित केले होते.मात्र कोरोनामुळे अद्यापही शाळा नियमित सुरू झालेल्या नाहीत. जानेवारीच्या सुरुवातीला इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू झाल्यानंतर गेल्या आठवड्यापासून इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्ग सुरू झालेले आहेत. कोरोनाचा धोका अद्यापही टळलेला नसल्यामुळे यंदा क्रीडास्पर्धांचे आयोजन न करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतल्याची माहिती शिक्षणाधिकारी सुनीता धनगर यांनी दिली.

> कोरोनाचा धोका अद्यापही टळलेला नाही. त्यामुळे सामूहिक प्रकारात आयोजित केल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धा यंदा न घेण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. यासाठी अंदाजपत्रकातही तरतूद करण्यात आलेली नसल्याने यंदा क्रीडा महोत्सवासाठी निधीचेही नियोजन नाही.
>
> **सुनीता धनगर,** शिक्षणाधिकारी, मनपा

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आज नाशिक दौऱ्यावर

## सटाणा, सुरगाणा आणि नाशिकमध्ये कार्यक्रम

**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी):** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी बुधवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी नाशिक जिल्हा दौऱ्यावर येणार असून त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी व अधिकाऱ्यांनी राजशिष्टाचाराचे तसेच कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोरपणे पालन करून राज्यपालांचा दौरा यशस्वी करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी सुरज मांढरे यांनी दिल्या आहेत. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील सटाणा नगर परिषद व देवमामलेदार यशवंतराव महाराज मंदिर ट्रस्ट, सटाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देवमामलेदार यशवंतराव महाराज मंदिराच्या भूमिपूजन कार्यक्रमास सकाळी ११ ते दुपारी १२:३० वाजता उपस्थित राहणार आहेत. यानंतर दुपारी २:३० वाजता राज्यपालांच्या हस्ते सुरगाणा तालुक्यातील भिंतघर (गुलाबगाव) येथील वनवासी सांस्कृतिक भवनाचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. तद्‌नंतर राज्यपाल सुरगाणा तालुक्यातील भिंतघर येथील गोशाळेस भेट देणार असून त्यानंतर नाशिककडे प्रयाण करणार आहेत.

सातपूर येथील 'नॅशनल ब्लाईंड असोसिएशन'च्या संशोधन व प्रशिक्षण निवास केंद्राच्या भूमिपूजन कार्यक्रमास सायंकाळी ५ ते ६ या कार्यक्रमानंतर राज्यपाल शासकीय विश्रामगृह, गोल्फ क्लब येथे मुक्काम करणार आहेत. या सर्व दौऱ्यात सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेली कामे राजशिष्टाचारानुसार विहित वेळेत पूर्ण करावीत. तसेच जिल्ह्यात होणाऱ्या तीनही कार्यक्रमांचे नियोजन सर्व अधिकाऱ्यांनी समन्वयाने पार पाडावे, असे जिल्हाधिकारी मांढरे यांनी सांगितले.

### निवेदन व भेटण्यासाठी परवानगी आवश्यक

यावेळी जिल्हाधिकारी सुरज मांढरे म्हणाले, ''राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना त्यांच्या नाशिक जिल्हा दौऱ्यादरम्यान ज्या व्यक्ती अथवा संघटनांना निवेदने द्यावयाचे असतील. त्यांनी जिल्हा प्रशासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी भागवत डोईफोडे यांच्याकडे नावांची नोंदणी करून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पूर्वपरवानगी घ्यावी,'' असेही आवाहन यावेळी करण्यात आले.

# भगूरमध्ये साहित्य संमेलन आयोजकांचा जाहीर निषेध



**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी):** नाशिक ही स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांची जन्मभूमी व कर्मभूमी नाशिक असल्याने व ९४ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन नाशिक येथे होत असल्याने तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मराठी साहित्यासंदर्भात केलेल्या कार्यामुळे नाशिक येथील आगामी साहित्य संमेलनाच्या संमेलन नगरीस 'स्वातंत्र्यवीर सावरकर नगरी' असे नाव देण्याची मागणी भगूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर समूहाने साहित्य महामंडळाच्या अध्यक्षांकडे केली होती. मात्र, नाव देण्याबाबतची संपूर्ण भूमिका निवेदनात विशद करण्यात आलेली असतानाही संयोजकांनी जाणीवपूर्वक स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव देणे टाळले. त्यामुळे भगूरपुत्र स्वातंत्र्यवीर सावरकर समूहाच्यावतीने भगूरमध्ये मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजकांचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला.

मात्र, यामध्येदेखील काहीजण बुद्धिभेद करून कुसुमाग्रज यांच्या नावाला विरोध असल्याचे भासवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना स्वातंत्र्यवीर सावरकर समूहाने म्हटले आहे की, वस्तुतः सावरकर, कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, गोविंदाग्रज, रामदास स्वामी या सर्वांचेच कार्य हे असामान्यच आहे. त्यामुळे मराठी माणूस म्हणून असा विरोध असण्याचे काही एक कारण नाही. मात्र, स्वातंत्र्यवीर सावरकरांवर प्रत्येक ठिकाणी अन्याय केला जातो, त्यांच्या नावाला विरोध केला जातो, या गोष्टी जनतेसमोर येणे आवश्यक आहे. म्हणून हा निषेध नोंदविण्यात आलेला आहे. दि. १ फेब्रुवारी, १९६६ मध्ये स्वातंत्र्यवीरांनी आपले कार्य समाप्त झाले म्हणून 'प्रायोपवेशन' सुरू केले होते. त्यांच्या जन्मभूमी भगूर येथे साहित्य संमेलनाच्या आयोजकांचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी मनोज कुवर, प्रशांत लोया, मृत्युंजय कापसे, प्रमोद आंबेकर, निलेश हासे, भूपेश जोशी, श्याम देशमुख, गणेश राठोड, रामदास गाढवे, प्रवीण वाघ, सुनील जोरे, रतन वाघचौरे, शांताराम करंजकर, मधुकर कापसे, चेतन आंबेकर, रमेश नाईकवाडे, चेतन आंबेकर आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांचे उद्या व्याख्यान

**नाशिक:** सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने डॉ. विनायक गोविलकर (ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ) यांचे 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२१' या विषयावर विवरण करणारे व्याख्यान गुरुवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी सायं. ६ वा. प. सा. नाट्यगृह, सावाना आवार, टिळकपथ, नाशिक येथे होणार आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पात दिलेल्या सवलती या खरोखरच नागरिकांपर्यंत पोहोचणार का? सामान्यांना या सवलती कधी मिळणार? कोणत्या गोष्टी महाग होणार ? कोणत्या स्वस्त होणार ? त्याचप्रमाणे या अर्थसंकल्पाचा दूरगामी परिणामी काय होणार? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या व्याख्यानांतून मिळणार आहेत. या व्याख्यानाचा लाभ नाशिककरांनी घ्यावा, असे आवाहन कार्यकारी मंडळ सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांनी केले आहे.

### फूड पार्क' आणि 'योग सिटी' ही नाशिकची नवी ओळख

**नाशिक :** नाशिकमध्ये बांधकाम उद्योगास पोषक वातावरण असून, जिल्ह्याला नवीन ओळख मिळण्याच्या दृष्टीने 'फूड पार्क' आणि 'योग सिटी' या दोन प्रकल्पांचा विचार यायला हवा. या दोन प्रकल्पांमुळे शहराची निश्चितच नवीन ओळख निर्माण होईल, असा विश्वास 'क्रेडाई नाशिक'चे उपाध्यक्ष शांतिलाल कटारिया यांनी 'क्रेडाई नाशिक मेट्रो'तर्फे आयोजित राष्ट्रीय शिखर परिषदेत पत्रकारांशी संवाद साधतांना व्यक्त केला. राज्यातील ५८ शहरांतील 'क्रेडाई' अध्यक्षांच्या दोन दिवसीय शिखर परिषदेचे नुकतेच आयोजित करण्यात आले होते. 'क्रेडाई राष्ट्रीय समिती'चे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांनी 'क्रेडाई'ची भूमिका स्पष्ट केली. क्रेडाईचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मगर म्हणाले की, दि. ३ डिसेंबरपासून लागू करण्यात आलेल्या या नियमावलीची सध्या जनजागृती करण्यात येत असून, शासनस्तरावरदेखील प्रयत्न केले जात आहेत. 'रिअल इस्टेट' क्षेत्राला उद्योगाचा दर्जा मिळावा, यासाठी 'क्रेडाई' प्रयत्न करत असून 'रेरा', जीएसटी आल्यानंतर शासनाने बांधकाम व्यवसायाला उद्योगाचा दर्जा देणे अपेक्षित आहे.

# राम मंदिरासाठी चिमुकलीचा खारीचा वाटा

**सटाणा, दि. २ (प्रतिनिधी):** सटाणा शहरातील चिमुकलीने आपल्या गल्ल्यात जमवलेले पैसे राम मंदिर निधीत समर्पित करून मंदिर उभारणीत खारीचा वाटा उचलला आहे. अयोध्येत श्रीराम जन्मभूमीवर प्रभू श्रीरामांचे भव्य मंदिर उभारले जाणार असून त्यासाठी निधी संकलन व गृहसंपर्क अभियानास प्रारंभ झाला आहे. रा. स्व. संघ स्वयंसेवकांसह समस्त रामभक्त प्रत्येकजण आपापल्या परीने त्यात सहभागी होऊन आपला वाटा उचलताना दिसून येत आहे. शहरातील रहिवासी व भाजप जिल्हाध्यक्ष निलेश पाकळे यांची कन्या स्वरा पाकळे हिने आपल्या गल्ल्यात जमा झालेले ४,५०० रुपये राम मंदिर निधीत समर्पित केल्याने तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



शहरात राम मंदिरांसाठी निधी संकलनाचे काम सुरू होते. त्यावेळी स्वरा त्याठिकाणी होती. तिने आपल्या वडिलांना पैसे कशासाठी घेण्यात येत आहे, याबबत विचारणा केली असता राम मंदिर उभारणीसाठी निधी संकलन सुरू असल्याचे तिला सांगितले. हे समजताच स्वराने वडिलांना सांगितले की, ''माझ्या गल्ल्यात जमा झालेली रक्कम पण आपण राम मंदिरासाठी देऊ.'' त्यातील ४,५०० रुपये राम मंदिरासाठी देण्यात आले.

# साडेतीन लाख बालकांना 'पोलिओ' डोस

**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी):** नाशिक जिल्ह्यात 'पोलिओ' लसीकरण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्ह्यातील ३ लाख, ४ हजार, ९९८ बालकांना 'पोलिओ' डोस देण्यात आला. एकूण ९५ टक्के लसीकरण करण्यात आल्याचे आरोग्य यंत्रणेकडून सांगण्यात आले. या लसीकरणाला जिल्हा रुग्णालय तसेच, विविध ठिकाणी शुभारंभ झाला. जिल्ह्यात ६ हजार, ९५९ केंद्रांवर डोस देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. देशाला 'पोलिओमुक्त' ठेवण्याच्या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पाच वर्षांपर्यंतच्या बाळांना 'पोलिओ' डोस देण्याचे कर्तव्य नाशिककरांनी पार पाडले.

# महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा सटाणाद्वारे 'वित्तीय साक्षरता अभियाना'चे आयोजन

**सटाणा, दि. २ (प्रतिनिधी):** महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा सटाणा यांनी वित्तीय साक्षरता अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी 'प्रधानमंत्री जीवनज्योती विमा', 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा', 'अटल पेन्शन योजना', 'डिजिटल बँकिंग', 'मोबाईल बँकिंग', 'एलआयसी', 'किसान क्रेडिट कार्ड', स्वस्त व्याज दराचे सोनेतारण कर्ज, व्यापारी कर्ज, 'मेडिक्लेम' विमा आदी योजनांविषयी सविस्तर माहिती सटाणा शाखा व्यवस्थापक मिलिंद पगार, अधिकारी प्रियांका भोये, 'असिस्टंट मॅनेजर' प्रफुल्ल पाटोळे यांनी उपस्थित ग्रामस्थांना दिली. याप्रसंगी गावातील सर्वांची विमा पॉलिसी घेऊन '१०० टक्के गाव' या योजनेत घेण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला. यावेळी उपसरपंच देविदास अहिरे यांनी शाखा व्यवस्थापक मिलिंद पगार, प्रियांका भोये, प्रफुल्ल पाटोळे यांचा यथोचित सत्कार केला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विश्वास अहिरे, छोटू अहिरे आणि देवा बापू यांनी परिश्रम घेतले.

# शिवजयंतीसाठी साकारला तब्बल ७० किलो वजनाचा टाक

## शिवप्रेमींमार्फत शिवजयंतीच्या तयारीला वेग



**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी):** महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवाजी महाराजांची जयंती अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्या अनुषंगाने शहरातील शिवप्रेमींमार्फत शिवजयंतीच्या तयारीला वेग आल्याचे दिसून येत आहे. छत्रपती सेनेमार्फत यंदाच्या वर्षी साजऱ्या करण्यात येणाऱ्या शिवजयंतीस शिवरायांची मुद्रा असलेला टाक तयार करण्यात येणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये १४ फूट उंची असलेला जिरेटोप आणि २०२० मध्ये १३५ किलो वजनाची १३ फूट रुंदीची भवानी तलवारीची प्रतिकृती साकारून त्याची नोंद लंडन येथील 'वंडर बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये करण्यात आली होती. या टाकाचे अनावरण जुने सीबीएसजवळील शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळील प्रांगणात केले जाणार आहे. त्यानंतर संगमनेर तालुक्यातील ७ ते १२ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या शिवकालीन मैदानी खेळ आणि शौर्याचे प्रदर्शनदेखील नाशिककर नागरिकांना अनुभविण्याची संधी मिळणार आहे.

### असा साकारला टाक

शिवजयंतीसाठी साकारण्यात येणारा टाक आठ फूट उंच आणि सहा फूट रुंद अशा आकाराचा आहे. ७० किलो वजनाचा टाक घडविण्यासाठी तांबे, पितळ यांसह लाख आदी साहित्याचा वापर करण्यात आला आहे. हा टाक घडविण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागला. शिवजयंती दिनी संध्याकाळी वाकडी बारव येथून निघणाऱ्या पारंपरिक मिरवणुकीमध्ये शिवाजी महाराजांच्या या टाकाला चित्ररथावर विराजमान करण्यात येणार असून, गतवर्षी साकारलेली विश्वविक्रमी भवानी तलवार मविप्र वस्तुसंग्रहालयाला भेट दिली जाणार आहे.

# महाविद्यालये सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांचा आक्रोश

**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी):** महाविद्यालये सुरू करण्याबाबत उदासीन असलेल्या राज्य सरकारच्या विरोधात अभाविप नाशिकतर्फे विविध महाविद्यालयात निदर्शने करून शिक्षणमंत्री उदय सामंत यांना प्राचार्यांमार्फत निवेदन पाठवून महाविद्यालये सुरू करण्याची मागणी केली. यावेळी अभाविप महानगरमंत्री सिद्धेश खैरनार म्हणाले की, महाविद्यालय परिसर हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा केंद्रबिंदू म्हणून ओळखला जातो. परंतु, आज महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांचे शुल्क घेऊन महाविद्यालय बंद ठेवणे ही गोष्ट शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय व महाविद्यालयांची वसतिगृहे त्वरित सुरू करावीत व त्याचसोबत बस थांबा, खानावळी इत्यादी विद्यार्थी गरजेची ठिकाणे सुरू करावीत.




सदर मागणी घेऊन अभाविपतर्फे आज राज्यव्यापी 'महाविद्यालय उघडा' आंदोलन करण्यात आले. त्यात नाशिक महानगरातील बी. वाय. के. महाविद्यालय, केटीएचएम महाविद्यालय आणि के. के. वाघ महाविद्यालय पिंपळगाव बसवंत या तीन ठिकाणी आंदोलन करण्यात आले. तसेच एकूण नऊ महाविद्यालयांतील प्राचार्यांच्यामार्फत शिक्षणमंत्र्यांना निवेदने देण्यात आले. या वेळी महाविद्यालय परिसरात 'सुरू करा! सुरू करा! महाविद्यालय सुरू करा!', 'शिक्षणमंत्री दौऱ्यावर! विद्यार्थी मात्र वाऱ्यावर!', 'चित्रालये सुरू! मद्यालये सुरू! पक्ष कार्यालये सुरू ! पण ज्ञानालये बंद!' अशा घोषणा देऊन विद्यार्थ्यांनी आक्रोश नोंदवला. यावेळी अभाविप महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री विराज भामरे, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य ऐश्वर्या पाटील, जिल्हा संयोजक अथर्व कुळकर्णी, राकेश साळुंखे, महानगर सहमंत्री सौरभ धोत्रे , ओम मालुंजकर, दिव्या सिंग, सचिन शितोळे, श्रेयस पारनेरकर, हर्षदा कदम, संस्कृती शेळके, ऋषिकेश शिरसाठ, अद्वैत जोशी, कौस्तुभ पिल्ले, देवेश चिंचाळकर, संस्कार सोनवणे, वैष्णवी शिरसाठ, पायल छाजेड, तपस्वी गोटरणे, ऋची अग्रवाल आदी कार्यकर्ते व महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

# आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिकारी व स्वयंसेवकांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी):** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे संलग्नित नाशिक येथील मोतीवाला होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. स्वानंद नारायण शुक्ल यांना शासनाकडून 'कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार' आणि पुणे येथील टिळक आयुर्वेद महाविद्यालयाची पूजा नागनाथ पांढरपुरे हिला 'सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक' या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिलीप म्हैसेकर, प्रति-कुलगुरु डॉ. मोहन खामगावकर, कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण यांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन व कौतुक केले.

**ATCOM TECHNOLOGIES LIMITED**
CIN No.L29299MH1989PLC054224
Regd. Office- Flat No. 5, Sannidhan, Plot No. 145, Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai 400031
Tel No. 022-35566211
Website:www.atcomtech.co.in
Email: contact@atcomtech.co.in

**NOTICE**
Notice is hereby given pursuant to Regulation 29 and 47 of SEBI (LODR) Regulation, 2015, that the meeting of the Board of Directors will be held on Friday, 12th February, 2021 at Flat No. 5, Sannidhan, Plot No. 145 Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai-400031 to consider and approve the Unaudited Financial Results for the quarter ended December 31, 2020. The said notice can be accessed at the company website above and at the website of NSE and BSE

For Atcom Technologies Limited
Sd/-
Vikram Doshi
Managing Director
Place: Mumbai
Date :02/02/2021

**VAARAD VENTURES LIMITED**
CIN: L65990MH1993PLC074306
Flat No.5, Sannidhan, Plot No. 145, Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai -400031
Tel: 022-35566211
E-mail : cs.dept@vaaradventures.com
Website:www.vaaradventures.com

**NOTICE**
Notice is hereby given pursuant to Regulation 29 and 47 of SEBI (LODR) Regulation, 2015, that the meeting of the Board of Directors will be held on Friday, 12th February, 2021 at Flat No. 5, Sannidhan, Plot No. 145 Indulal D Bhuva Marg, Wadala, Mumbai-400031 to consider and approve the Unaudited Financial Results for the quarter ended December 31, 2020. The said notice can be accessed at the company website above and at the website of BSE.

For Vaarad Ventures Limited
sd/-
Leena Doshi
Managing Director
Place: Mumbai
Date :02/02/2021

MSE
**METROPOLITAN STOCK EXCHANGE OF INDIA LTD.**
**NOTICE**
Notice is hereby given that the following Trading Member of the Metropolitan Stock Exchange of India Limited (the Exchange) has been declared a Defaulter under Byelaw 2(B) of Chapter XV and Expelled under Byelaw 2 of Chapter XV of the Byelaw of the Exchange.

| Sr. No. | Member Name | SEBI Reg. No. | Declaration Date |
|---|---|---|---|
| 1 | Action Financial Services (India) Ltd | INZ000179538 | January 22, 2021 |

The constituents of the aforementioned member are hereby advised to lodge claims, if any, in the prescribed claim form, against the above mentioned member within 3 months from the date of this notification. No claims filed beyond 3 months will be entertained by the Exchange against the above mentioned member, and it shall be deemed that no such claims exist against the said member. The claims filed against the above mentioned member will be dealt with in accordance with the Byelaws, Rules, Regulations and the procedures of the Exchange.
The maximum compensation limit per investor is Rs. 2 lakhs out of the Investor Protection Fund if found due and payable under the Byelaws, Rules and Regulations of the Exchange.
The claim form along with the relevant papers may be sent to the Defaulters' Committee Section of the Exchange at 'Metropolitan Stock Exchange of India Limited', Vibgyor Towers, 5th Floor, Plot No. C-62, G- Block, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai – 400098. The claim form may be downloaded from https:www.msei.in or may be obtained from the corporate office of the Exchange or the regional / branch offices of the Exchange.
The authorised persons affiliated with the above mentioned member are not authorised henceforth to deal in that capacity. The list of such authorised persons is available on http://www.msei.in/ . Investors may take note of the same.

For **Metropolitan Stock Exchange of India Ltd.**
*Sd/-*
Senior Vice President
Defaulters' Committee Section
Place: Mumbai
Date: February 3, 2021

# जिल्ह्यात नवीन ५६ हजार मतदारांना 'ई-ईपिक' करता येणार 'डाऊनलोड'

**नाशिक, दि. २ (प्रतिनिधी) :** डिजिटलायझेशनचा मार्ग चोखाळत 'ई-ईपिक'ची सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या निवडणूक आयोगाने हे कार्ड आता केवळ २०२० ते २०२१ या वर्षात विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत नव्याने नोंदणी केलेल्या मतदारांसाठीच उपलब्ध केले आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील ५६ हजार, ०९ मतदारांना ते डाऊनलोड करता येणार आहे. सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर २०२०-२०२१ या वर्षात नव्याने नोंदणी झालेल्या मतदारांसाठीच 'ई-ईपिक' ही सुविधा उपलब्ध केली होती. दि. १ फेब्रुवारीपासून 'ई-ईपिक' हे सर्वांसाठी उपलब्ध करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. त्यासाठी मोबाईल नंबरही अनिवार्य करण्यात आला होता. पण आता सोमवारी आयोगाने हे कार्ड २०२०-२१ या वर्षातच नव्याने नोंदणी झालेल्या मतदारांनाच डाऊनलोड करता येईल. दि. २८ फेब्रुवारीपर्यंत त्यांना ही सुविधा असेल. त्यामुळे २०२०-२१ या वर्षापूर्वी नोंदणी झालेल्या मतदारांना हे कार्ड आताच उपलब्ध होणार नसून, ते दि. १ मार्चपासून मिळणार असल्याचे निवडणूक शाखेच्यावतीने सांगण्यात आले आहे.

### या संकेतस्थळावर सुविधा

https://nvsp.in या संकेतस्थळावरुन स्वत:चे मतदानकार्ड घरबसल्या डाउनलोड करता येईल. मतदान कार्ड हरवले तरी लगेच या वेबसाईटवर जाऊन नवीन मतदान कार्ड डाऊनलोड करता येईल. जिल्ह्यातील यंदा नव्याने नोंदणी झालेले ५६ हजार ०९ मतदार आहेत. या मतदारांना २८ मार्चपर्यंत इ-ईपिक मिळेल. तर उर्वरित ४५ लाख ८ हजार १२० मतदारांना १ मार्चपासून हे डिजिटलाइझ कार्ड मिळणार आहे.

**TECH MAHINDRA LIMITED**
**Registered Office : Gateway Building, Apollo Bunder, Mumbai- 400 001.**
**Corporate Office : Corporate Block, 2nd floor, Plot No. 1, Phase III, Rajiv Gandhi Infotech Park, Hinjawadi, Pune- 411057**

**LOSS OF SHARE CERTIFICATE(S)**

Notice is hereby given that the following Share Certificate(s) pertaining to Equity Shares of Rs. 5/- each of **Tech Mahindra Limited,** Registered Office : Gateway Building, Apollo Bunder, Mumbai-400 001, registered in the name of below mentioned shareholder(s), have been reported to have been lost/misplaced/stolen and that the application(s) for issue of Duplicate Share Certificate(s) in respect thereof have been received by the Company.

| Folio | Registered Shareholder(s) | Share Cert. No.(s) | Distinctive No.(s) No. From - To | No, of Shares |
|---|---|---|---|---|
| 0001993 | Kadambari Nitin Rege | 1028<br>3864 | 545321 - 545436<br>480868475 - 480868590 | 116<br>116 |

The public are hereby cautioned against dealing in any way, with the above Share Certificate(s). If within 15 days from the date of Publication hereof no claim is received by the Company in respect of the said Share Certificate(s), Duplicate Share Certificate(s) will be issued and thereafter no claim will be entertained.

For TECH MAHINDRA LIMITED
Sd/-
Anil Khatri
Company Secretary

PUNE
DATE : 02.02.2021